प्रकरण तिसरे

चारुता सागर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण

प्रकरण तिसरे –

चारूता सागर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण

('नागीण' या कथासंग्रहाच्या अनुषंगाने)

प्रास्ताविक :

दिनकर दत्तात्रय भोसले उर्फ चारुता सागर यांनी आपल्या कथालेखनाने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. चारूता सागर यांचे मूळगांव सांगली जिल्ह्यातील 'मळणगाव' हे आहे. प्राथमिक शिक्षक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. त्याबरोबरच त्यांनी सैनिक बनून देशाची सेवा केली. शरदच्चंद्र चॅटर्जी यांच्या साहित्याने प्रभावित होऊन बंगाल प्रांतात भटकंती करून मानवी जीवनाच्या विविध पैलूंचा अनुभव घेतला. काही काळ बेवारशी प्रेते उचलण्याचेही त्यांनी काम केले. त्यामुळे त्यांच्या सभोवताली समाजात असणाऱ्या सर्व घटकांचे चित्रण त्यांनी आपल्या लेखनात अगदी समग्रपणे केलेले दिसते. त्यांचे 'नागीण' व 'मामाचा वाडा' हे दोन महत्त्वाचे कथासंग्रह आहेत. 'नागीण' या कथासंग्रहात देवदासी, डोंबारी, नंदीवाले, गारूडी, फासेपारधी, रामोशी, मांग, बेवारशी मढी उचलणारे अशा विविध जातींच्या आणि उपेक्षितांच्या जीवनाचे दर्शन आपणांस घडते.

चारूता सागर यांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रणाचा अभ्यास खालील मुद्यांच्या आधारे करणे येथे अभिप्रेत आहे.

१) 'डोंबारी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा.'
२) 'बेवारशी मढी उचलणाऱ्यांचे चित्रण करणारी कथा.'
३) 'फासेपारधी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा.'
४) 'गारूडी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा.'
५) 'देवदासी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा.'

६) 'रामोशी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा.'

७) 'नंदीवाले समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा.'

१) डोंबारी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा

चारूता सागर यांच्या सर्वच कथा समाजातील प्रत्येक घटकांचे चित्रण करणाऱ्या आहेत. भटक्या समाजातील त्यांचे कथालेखनाने वाचकांच्या समोर एक वेगळेच जग उभे करतात. त्यांचे दुःख, वेदना, अवहेलना यांचे समग्रतेने चित्रण त्यांच्या कथालेखनात येते. त्यांची 'ढोलगं' ही कथा डोंबारी समाजातील व्यक्तीचे चित्रण करणारी आहे.

'ढोलगं' या कथेचा नायक 'बाबल्या' हा आहे. कथेची सुरुवातच 'बाबल्यांच्या' शारीरिक व मानसिक अवस्थेवरून झालेली आहे. त्याचे वर्णन करताना कथाकार म्हणतो, ''माळावरच्या पालात बाबल्या पडला होता. उजवा पाय गुडघ्यातनं काढलेला, छातीची एक बरगडी पिचलेली, मन फाटलेलं आणि अंग सुकलेल्या कातड्यावानी आकसून आलेलं जिथं पायच गेला, तिथं असून नसल्यासारखं, आपलं आता उरलंच काय? मेलेल्या मुडद्यावानी. मनात विचारांचं हे भेंडूळ'' (ढोलगं, पृ.४९)

बाबल्याची दयनीय अवस्था मात्र त्याच्या बापाला म्हणजे भुजिंगाला पहावत नसते. बाबल्या खेळ करताना जेव्हा तारेवरून पडतो व पाय मोडून बसतो तेव्हापासून भुजिंगाने ढोलगं फेकून दिलेले असते. आता मी हे ढोलगं कुणासाठी वाजवू? आणि ढोलगं वाजविले तर तारेवर नाचणार कोण? या विचाराने भुजिंगा हातपाय गाळून बसतो. तो म्हणतो, ''तारेवरची कसरत करावी. बाबल्यानं मनगटानं दगडाची फाळ फोडावी, बाबल्यानं घोडा उडवावा त्यानं छातीवर गोळं झेलावेत

त्यानं लोखंडाची पार फोकंसारखी वाकवावी नि प्रेक्षकांचं काळीज थरारून सोडावं, त्यांच्या टाळ्यांचा प्रचंड प्रतिसाद घ्यावा.''[१]

असा बाबल्या सगळीकडे आपल्या खेळाने नावाजलेला असतो. पाच पन्नास खेड्यात त्याचं नाव झालेले असते. सुगीच्या दिवसात डोंबाऱ्यांची पालं पाहून 'बाबल्याचं पालं नव्हं का?' म्हणून लोक प्रश्न विचारत व संध्याकाळी एखादा खेळ व्हावा अशी इच्छा व्यक्त करीत.

अशाच प्रकारचा खेळ करणारे आणखी एक डोंबाऱ्याचे कुटूंब असते. त्यामध्ये शेवंती नावाची मुलगी खेळ करीत असत. अशाच प्रकारे एकेदिवशी येतगावच्या भैरुबाच्या जत्रेमध्ये खेळ करीत असताना शेवंतीच्या पायाचा तोल हरवतो व ती खाली कोसळताच जगन्या नावाचा डोंबारी तिला वाचवितो. तेव्हापासून जगन्याच्या मनात शेवंतीशी लग्न करायची इच्छा निर्माण होते. शेवंतीला मागणी घालण्यासाठी जगन्या त्यांच्या घरी जातो. परंतु जगन्याचा ढंगबाज स्वभाव बघून हरण्या लग्नाला नकार देतो.

हरण्या शेवंतीसाठी लग्नाची मागणी घालण्यासाठी बाबल्याच्या घरी जातो. भुजिंगा हरण्याचा पाहुणचार करतो. नंतर बाबल्याचा खेळ पाहणायसाठी हरण्या, शेवंती जातात. बाबल्या आपल्या खेळाद्वारे आपली कसब दाखवू लागतो.

डोंबाऱ्याच्या जीवनाचे वर्णन करताना कथाकार म्हणतो, '' डोंबाऱ्याचा खेळ म्हणजे जादूटोण्याचा किंवा नजरबंदीचा खेळ न्हवं. रक्ताचा खेळ. घामाचा खेळ. रक्त आटवावं घाम गाळावा, तेव्हा कुठं पसाकुडता मिळतो.''[२]

बाबल्याचा तारेवरचा खेळ चालू असतानाच त्याचा जगन्यामुळे तोल जातो व तो खाली पडातो. तो शुद्धिवर येतो तो दवाखान्यातच. त्याचा एक पाय काढलेला असतो. त्याची असहाय, केविलवाणी अवस्था पाहून भुजिंगाच्या

डोळ्यांत पाणी येते व मनात अनेक विचारांचे काहूर माजते. तो म्हणतो, ''आता हा तर एका पायानं अधू झाला. माझ्या माघारी याची उस्तवार कोण करणार? कोण खा बाबा म्हणणार? कोण जेव बाबा म्हणणार? काळजाचं काळीज घालून संभाळला. चिमणीसारखा घास भरविला. काय काय स्वप्नं रचून जगत आलो अन् त्याचा शेवट झाला, तो असा आम्ही आमचा खेळ मांडतो. पण आमच्यासाठी विधीनं मांडलेला असतो वेगळाच'' (ढोलगं, पृ. ५६)

बाबल्याची अवस्था पाहून हरण्या शेवंतीला तिथे द्यायचे नाकारतो व जगन्याबरोबर लग्न लावून देण्याचा निर्णय घेतो. शेवंती मात्र लग्नाला साफ नकार देते. असेच काही दिवस निघून जातात व एकेदिवशी शेवंती न राहवून हरण्याला म्हणते, ''बाबल्याला बघावसं वाटतंय बरा झालाय का तस्सा हाई ते!''

हरण्या शेवंतीला घेवून भुजिंगाच्या पालांकडे जातो. शेवंती बाबल्यास भेटावयास जाते. शेवंतीला पाहताच बाबल्याच्या डोळ्यातून पाणी टपटपू लागते. शेवंतीही आपला हुंदका घुटते. हरण्या शेवंती व बाबल्याच्या लग्नाची बोली करतो. तेव्हा भुजिंगा आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागतो. त्यांच्या बोलण्याचा त्याला विश्वास बसत नाही. म्हणून तो हरण्याला म्हणतो की, ''खरं म्हणतासा? खोटं कशाला म्हणू? ते बघा!'' दोघेही पाहतात तो बाबल्या शेवंतीच्या खांद्याच्या आधाराने उभा आहे व शेवंती आपल्या पदरानं बाबल्याच्या डोळ्यातील टिपं टिपत आहे.

अशाप्रकारे चारुता सागर यांनी आपल्या 'ढोलगं' या कथेत उपेक्षित जीवन जगत असताना माणूसकी मात्र त्यांनी सोडली नाही याचे प्रत्ययकारी वर्णन केलेले आहे.

२) बेवारशी मढी उचलणाऱ्यांचे चित्रण करणारी कथा

समाजात पोटासाठी सतत कोणती ना कोणती कामे करणाऱ्या व्यक्ती असतात. त्यामध्ये गारुडी, पारधी, अस्वलवाले अशा अनेक व्यक्ती आहेत. यामध्येच बेवारशी मढी उचलण्याचे काम करून पोट भरणाऱ्या व्यक्तीही आहेत. अशाचप्रकारे बेवारशी मढी उचलण्याचे काम करून पोट भरणाऱ्या सत्याप्पा व बन्याच्या जीवनात कशाप्रकारे दुःखे येतात याचे चित्रण चारुता सागर यांनी 'वर्दी' या कथेत केलेले आहे.

'वर्दी' या कथेतील गुणवंतराव हा नामदेव शिंपी समाजातील आहे. त्याच्या दुकानाचे नाव'नारायण टेलरिंग फर्म' आहे. त्याला समाजसेवेची खूप आवड आहे. त्याच्या दुकानापुढे वीस वर्षापूर्वी एक घटना घडलेली असते. सकाळी गुणवंतराव दुकानात आले असता तिथे एक अनामिक व्यक्ती मरून पडलेली असते. मढं फुगत असते. पंचनामा करून पोलिस गुणवंतरावांना 'टाका जावा पुरुन' असे सांगून निघून जातात. तेव्हा त्याला अनेक प्रश्न पडतात. 'याची तिरडी बांधायची कशी? खांदेकरी आणायचे कुठले?' तोच एक मुलगा पुढं येवून गुणवंतरावांना, 'मालक, मढं न्यायचं आहे काय?' असे म्हणतो.

गुणवंतराव त्या मुलाला म्हणजेच सत्याप्पाला व त्याच्या साथीदाराला बन्याच्या ताब्यात ते मढं देतो. माणूस मेल्यावर जे काय सामान लागते तेही तो त्यांना आणून देतो. त्या अनाथ, अनामिक प्रेताची अंत्यविधी करणाऱ्या संस्थेची स्थापना त्या दोघांच्या आधाराने गुणवंतराव करतात. त्या दोघांच्या सहाय्याने गुणवंतराव वर्गणी गोळा करण्यास जावू लागतात. तेव्हापासून सत्याप्पा व बन्याला गुणवंतराव खांदेकरी म्हणून काम देतो. त्यांच्या कामाचे वर्णन करताना चारुता सागर म्हणतात, ''सत्याप्पा आणि बन्या हे दोघं खांदेकरी. एका प्रेतामागं पाच रुपये. उचलून स्मशानात न्यायचं. तिथं कमरेइतकं डबरं खोदून पुरायचं. एवढं त्यांचं

काम. गुलाल कापड, उदबत्ती असलं लागणारं सामान मालकानं द्यायचं. सारा मिळून खर्च साडेबारा रुपयांचा. हिशोब सरळ. एका प्रेताबरोबर साडेबारा वहीला खर्ची टाकायचे.''[३] एका प्रेतामागे सत्याप्पा व बन्याला पाच रुपये मिळू लागले. त्यावर ते दोघं पोट भरु लागलेली असतात. त्याअगोदर दोघेजण स्टेशनवर उतारुंचे सामान पोहचवण्याचे काम करत असतात. तेव्हाच त्यांची ओळख गुणवंतरावांशी झालेली असते.

गुणवंतराव त्यांना एक खोली देतो. खोलीमध्ये मढी पुरण्याच्या साहित्याबरोबरच हे दोघेजण राहतात. खोलीजवळच शंकरव्वाचं हॉटेल असते. सत्याप्पाचा खिसा कधी खाली नसायचा. त्यामुळे उठल्या-उठल्या हॉटेलात ते ऑर्डर सोडत, ''दोन गरम भजी, टेबल साफ. दोन ग्लास पाणी, जल्दी लाव'' (वर्दी, पृ. ६७)

परंतु काही दिवसातच त्यांचे हेही दिवस पालटतात व अत्यंत वाईट दिवस त्यांच्या वाट्याला येतात. नारायण फर्मकडे सत्याप्पा व बन्या येतात तेव्हा गुणवंतराव त्यांना विचारतो, ''काय आहे का कुठं?'' ''नाही, मालक, आता बघतो दोघं''. रात्रीची एखादी वर्दी नाही वाटतं?''(वर्दी, पृ. ६७) गुणवंतराव मात्र खुशीत असेल तेव्हा त्यांना विडी चहा देत असे.

त्यांच्या या कथालेखनाविषयी महावीर जोंधळे म्हणतात, ''ज्या जातीपातीची ओळख नाही अशा अनोळखी जगाच्या पालात घुसून तेथील समाज वास्तवाला आपलंसं मानणारा लेखक म्हणून चारुता सागर यांच्याकडे बघणे क्रमप्राप्त आहे.''[४]

पाऊस लागून तीन दिवस झालेले असतात. पण त्या दोघांना मात्र प्रेताची वर्दी मिळत नाही. गुणवंतरावांचे सत्याप्पा व बन्याला मात्र प्रेताविषयी विचारणे नेहमीचेच असायचे. नाही म्हणताच त्याचे तोंड काळे होई. वर्दी पाहण्यासाठी

सत्याप्पा बन्याला सांगून स्टेशनकडे जातो. इकडे बन्याही खोपटाजवळ येऊन म्हातारी मेलेली आहे का ते पाहतो. लेखक म्हणतो की, ''म्हातारी गोणपाट पांघरून आडवी झाली होती. जागजागी ठिबकत होतं. खोपट्यांच्या तोंडाला रिकामी बाटली पडली होती. म्हातारीनं कुशी बदलली. तेव्हा त्याला दिसलं, अद्याप म्हातारी चांगली जिवंत आहे.''[५]

बन्या सत्याप्पाला म्हातारी अजून जिवंत असल्याची बातमी देतो. बन्याचे ऐकून सत्याप्पा बैचेन होतो. सत्याप्पाच्या मनात विचार येतात, ''म्हातारी मरायला पाहिजे, किंवा दुसरी एखादी वर्दी यायला पाहिजे. त्याबिगर धडगत नाही. आजची रात्र कशी तरी जाईल. पण उद्याच काय? बन्या तर पार पेकाटून गेलाय. आपली तर काय अवस्था! निर्वाह नाही ते बोलणं. चालणं पोटात आकडा गोळा झालाय.'' (वर्दी, पृ. ६९) बन्याची अवस्था पाहून सत्याप्पाचे अतःकरण कळवळते. तसाच तो बाहेर पडतो व मालकाकडे जातो. गुणवंतराव त्याला विचारतो, ''काय सत्याप्पा, मेली का म्हातारी?'' 'नाही, मरलं आता. जास्तीत जास्त आजची रात्र आडवी जाईल.' ''सत्याप्पा खाली मान घालून उत्तर देतो. न मागताच मालक त्याला चहा व विडी देतो. सत्याप्पा म्हातारीवर दोन रूपये मागतो परंतु आधीची उधारी असल्याने मालक त्याला पैसे देण्यास नाकारतो.

तसाच तो रात्री बारापर्यंत सगळे शहर पालथे घालतो पण कुठेच प्रेत सापडत नाही. रात्री त्याला स्वप्न पडते. त्याचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ''तिरडीवर म्हातारी, नवं कापड, त्यावर गुलाल, फुलं टाकलेली, मातीत पुरली, चांगली बोराटी घालून. नदीत आंघोळ केली. तुकतुकीत आणि नारायण टेलरिंग फर्मपुढं उभे राहिलेत. मालकानं पाच रूपयाची कोरी नोट दिली. तशी शंकरव्वाच्या तोंडावर फेकली. टेबल पुसत पोरगं आलं. ताजी गरम भजी-खमंग खरपूस भजी.''[६]

स्वप्नातून जागे होऊन म्हातारीची वर्दी आलेली असेल म्हणून बन्याला उठवायला जातो तो बन्या मरुन पडलेला असतो. सत्याप्पा तसाच उठून नारायण टेलरिंग फर्मकडे पळत सुटतो. मालक वर्दी आली आहे का विचारताच तो म्हणतो, ''आणलीया मालक, वर्दी घेऊनच आलोय, मालक, बन्या गेला हो मला सोडून गेला.'' (वर्दी, पृ. ७१) असे म्हणून तो लहान मुलासारखा रडू लागतो. हंबरू लागतो. कशाने मेला हे विचारताच तो सांगतो, ''कशानं सांगू? कशानं बोलू? रात्री निजलेला. सकाळी उठून बघतोय, तर गार गार थंडगार. मान मुरगाळून पडलेली. पोटात वितभर डबरं. दोनतीन दिवस झालं, अन्नाचा कण नाही. पोट हापाळी हापाळी. पाठीपोटी एक झालेलं.''(वर्दी, पृ. ७१)

अशाप्रकारे स्वतः बेवारशी मढी पुरण्याचे काम करणाऱ्या बन्याचा शेवटी उपासमारीने अंत होतो. समाजातील अशा अनेक व्यक्तीचे चित्रण चारुता सागर यांनी बारकाईने निरीक्षण केलेले आहे व आपल्या कथेमध्ये ते जसेच्या तसे मांडलेले आहे.

३) फासेपारधी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा–

गावोगावी फिरून पोट भरणाऱ्या भटक्या जमातीपैकी फासेपारधी ही एक जमात. त्याच्याही वाट्याला सदोदित दुःख, हालअपेष्टाच आलेल्या असतात. आहे त्या परिस्थितीतच जीवन जगत असताना त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागत असते.

अशाच एका फासेपारधी जमातीतील जखऱ्या, त्याची बहीण कावरी व त्यांच्या आईच्या जीवनावरती चारुता सागर यांनी 'वाट' ही कथा लिहिलेली आहे.

आईच्या शेवटच्या घटकात भेटण्यासाठी आसुसलेल्या कावरीची कशी तगमग होते यांचे वर्णन वाचकांचे हृदय हेलावून सोडणारे असे आहे.

या कथेची नायिका 'कावरी' ही आहे. कावरीचे लग्न झाल्यावर एकदाच या मायलेकीची भेट झालेली असते. काही काळानंतर प्रत्यकांची पालं वेगवेगळ्या गावात पसरतात. त्यामुळे त्यांची ताटातूट होते. आतामात्र कावरीची आई जीवनाच्या शेवटच्या घटका मोजत असते आणि अशा क्षणाला ती आपल्या लाडकीची म्हणजेच कावरीची वाट पहात असते. तिच्या शेवटच्या घटकेविषयी वर्णन करताना लेखक म्हणतो की, ''बोलणं सगळं बंद होतं. अन्न जात नव्हतं. जीव राहवत नाही म्हणून जोंधळ्याच्या पिठाची तरवणी उगंच वाईचशी हातानं तिचं तोंड उघडून ती सोडत होती. 'नगं नगं' म्हणत म्हातारीची मान थोडी हालत होती. .....म्हातारीनं जमीन धरली होती. झालेली म्हातारी आता उठणार नव्हती. नुसत्या डोळ्यांत जीव उरला होता. घशाची फक्त घरघर होती.''[७]

म्हातारीला सगळी भेटलेली असतात. पण तिचा जीव कावरीत अडकलेला असतो. 'कवा लगीन झाल्यावर भेटली होती. त्याला झाली दोन-बारा वरसं, आता एकदा बघू दे, नुसती नदरं पडू दे' (वाट, पृ.११४) या आशेनं डोळ्यात प्राण आणून म्हातारी कावरीची वाट पहात असते.

कावरीच्या भावाची म्हणजेच जखऱ्याची वस्ती ही दंडोबाच्या घळीला वसलेली असते. त्या ठिकाणी कवठ्याचा बाजार जवळचा असतो. त्यामुळे त्याने सांगावा या बाजारला येणाऱ्या प्रत्येक गावच्या फासेपारध्यांना धाडलेला असतो. तो म्हणतो, ''भिमा पारध्याला म्हणावं, म्हातारी काय टिकायची दिसत न्हाई, पार निजून हाई, आणि कावरीला तेवढं पाठवून दे, त्याबिगर म्हतारीचा पण जीव जायचा न्हाई, जीवात ती आडकूनच हाई म्हण...''(वाट, पृ.११५, ११६) जखऱ्याचा हा सांगावा जत, मोहोळ, विटा, बारामती, पुणे, अथणीहून विजापूर पुढे

हुबळी, दावणगिरी आणि मिरजेहून निपाणी, कोल्हापूर व त्याच्यापुढेही कोकणपट्टी अशाप्रकारे साऱ्या मुलूखभर हा निरोप पोहचतो.

कावरीला व भिमाला मात्र तुळजापूरच्या बाजाराच्या दिवशी हा निरोप कळतो. आईला जास्त असल्याशिवाय सांगावा येणार नाही या विचारातच तिच्या डोळ्यांतून पाणी येते. जखऱ्याच्या वस्तीचे ठिकाण विचारून कावरी चार पोरं भिमाजवळ ठेवून लहान मुलाला घेऊन आईच्या भेटीसाठी निघते. एक-एक पाऊल टाकत ती बरेच अंतर चालते. तिच्या अनवणी अवस्थेविषयी वर्णन करताना लेखक म्हणतो की, "अनवाणी पाय, तापलेली वाट, चांगली डांबराची तुकतुकीत काळी, पायाला चटका देणारी"(वाट, पृ.११७)

लग्न झाल्यानंतर भैरोबाच्या जत्रेत तिला तिच्या आईने उभ्याउभ्याने पाहिलेले असते. तिची केविलवाणी मूर्ती कावरीच्या डोळ्यांसमोर दिसू लागते. सांगावा दिला म्हणून ती माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेली असेल असे मनात येऊन ती म्हणते, "न्हाई, न्हाई, मी न्हात न्हाई. जसं कळलं तसं निघालेय. कुठं सुदीक टेकली न्हाई. वाटच चालाय लागलीय. मी याय लागलीया. आई मला सोडून जाऊ नकोस."(वाट, पृ.११८) तिला एकच चिंता लागलेली असते की, आईची गाठ पडेल की नाही? दिवसामागून तीन दिवस ती सलग चालत असते. पहाटेपासून संध्याकाळपर्यंत चालायची व रात्री कुठेतरी विश्रांती करून पुन्हा पहाटे चालू लागायची. तिच्या या केविलवाण्या अवस्थेविषयी वर्णन करताना चारुता सागर म्हणतात की, "सारखा चालीनं तळपाय सोललं होतं. पायाला सूज आली होती. पिंढऱ्या ठसठसत होत्या. पुढं आणखी वाट होती. पण तिला एक ठावं रात झाली, की थांबायचं. रात निवळली की चालू लागायचं, चारचार पावलानं का होईना, अंतर तोडत राह्याचं."[८]

पाचव्या दिवशी तिला दंडोबाची रांग दिसू लागते. डोंगरघळीला असणाऱ्या गावात शिरते व प्रत्येकाला विचारू लागते, "बाबा, हितं एखादं पारध्याचं पालं उतरलंय का?" 'नाही' म्हणताच ती हताश होते. दुसऱ्यादिवशी सारा दंडोबाचा परिसर पालथा घालते. एका शेतकऱ्याच्या सांगण्यावरून कावरी पालं उतरल्याच्या ठिकाणी धावते पण तिला तेथे काहीच दिसत नाही. पुढं गेल्यावर मात्र तिला पालं उतरल्याचा खाणाखुणा दिसतात. तिला खात्री पटते की हे पालं जखऱ्याचेच आहे. काही अंतरावर मातीचा ढिगारा दिसताच ती धावते व हंबरडा फोडते.

आडरानी ऐकू येणाऱ्या हंबरड्यामुळे गुराखी, जळणासाठी आलेल्या बाया व शेतकरी येताच तिला जास्तच भरून येते. तिची अवस्था पाहून त्या स्त्रियांचेही डोळे ओलावतात. डोळ्यातील पाणी टिपत टिपत त्या म्हणतात, "लेक व्हय तू? तुझी तिनं लई वाट बघितली, डोळ्यांत जीव अडकवून तशी होती. गेल्या बुधवारी गेली, जीव जाता जात नव्हता. आम्ही बघतच हुतो. जाता येता. गाठ पडायचीच नव्हती....." (वाट पृ. १२०, १२१)

थोड्या वेळाने आलेली सर्वजण निघून जातात. कावरी मात्र आईसाठी बांधून आणलेले खायला मातीच्या ढिगाऱ्यावर ठेवते. लेखक म्हणतो, "किती कष्टानं तिनं वाट तुडविली होती, इथंवर आली होती, गाठ-भेट राहिली, निदान तिच्या प्रेतावर तरी, डोळ्यांनी दोन थेंब पडायला हवं होतं. दुःख हलकं व्हायला हवं होतं."[९]

चारुता सागर यांनी 'वाट' या कथेद्वारे कुठेही ठावठिकाणा नसणाऱ्या फासेपारध्यांच्या जीवनात एकमेकांच्या भेटीसाठी किती प्रयत्न करावे लागतात व त्यांच्या जीवनात शेवटी कशापध्दतीने दुःख येते याचे वर्णन अगदी तटस्थतेने केलेले आहे. या कथेतील फासेपारध्यांच्या भटक्या जमातीविषयी गो.मा.पवार म्हणतात की, "चारुता सागरांनी भटक्या लोकांची जाणीवेने व जिव्हाळ्याने मराठी

वाचकांना ओळख करून दिली. त्यांच्या कथांत आपल्याला दोन विशेष जाणवतात एक विविध जातीची नव्या समाजशास्त्रीय पातळीवरची जी माहिती मिळते ती थक्क करून टाकते. कारण आपल्या पांढरपेशांचे जग आणि भटक्या विमुक्तांचे जग ही दोन अंगे भिन्न आहेत.''[१०]

४) गारूडी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा–

चारुता सागर यांनी साप पकडून खेळ करून पोट भरणाऱ्या गारूडी समाजातील व्यक्तीवर आधारित ही कथा लिहिलेली आहे. त्यांनी समाजात वावरताना ज्या व्यक्ती पाहिल्या, त्यांचे आहे तसे वर्णन केलेले आहे. त्यांच्या 'पुंगी' या कथेत एका गारुड्याच्या कुटुंबावर कशाप्रकारे दुःखाचा डोंगर कोसळतो याचे चित्रण केलेले आहे.

'पुंगी' या कथेतील आली व आलीखाला गारूड्याचा खेळ करीत असतात. त्यांनी पाळलेला 'सरदाऱ्या' हा साप असतो. पोटच्या मुलागत आलीखालाने त्याला सांभाळलेले असते. असा हा सरदाऱ्या एक दिवस टोपलीत मरून पडलेला असतो. तेव्हापासून त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळतो. आली गप्प–गप्पच असतो. तीन दिवस झाले तरी आली कामाविषयी काहीच बोलत नाही. म्हणून खाला आलीला म्हणते, ''कितीदा असं बसून राहणार? मेलेल्यासंगं का मरायचं हाय!'' असे म्हणून आलीखाला आलीला समजावीत असते. स्वतः मात्र दुःख करीत असते. सरदाऱ्याची आठवणही घडीघडीला तिला येत असते. ती म्हणते, ''त्याला मांडीवर घेऊन दूध पाजलेलं. अंडी चारलेली. उशाखांद्यावर खेळवलेला. एक दोन नाही, पाच साल सोबत केली. एकेका खेळात दहा– दहा पंधरापंधरा रूपये मिळवून दिलं'' (पुंगी, पृ १००)

सरदाऱ्याविषयी इतर साप पारधी म्हणायचे की 'आमची जनावरं फुस्कारून अंगावर येत्याती आणि ह्ये! ह्येचं प्वाट फाडून आल्यागत' (पुंगी, पृ १००) सरदाऱ्याचा सांभाळच त्यांनी पोटच्या पोरागत केलेला असतो. खालाला सतत वाटायचे की आपली खाणारी तोंडं चार सरदाऱ्यावर आपलं पोट चालत होतं. आता आपला निभाव कसा लागायचा! त्यामुळे ती आलीला दुसरा एखादा साप पकडावा यासाठी विनवण्या करू लागते.

असेच एकेदिवशी सकाळी लवकर उठून साप पकडण्यासाठी बाहेर पडतात. ओढ्यात खालाला काहीतरी चमकलेलं दिसतं. ती पुढे येऊन पाहते, तर भलामोठा भुजंग पडलेला असतो. तिला आनंद होण्याऐवजी ती भितीने थरथरते. तिच्या अवस्थेविषयी वर्णन करताना लेखक म्हणतो, "धूड लांबच्या लांब पसरलं होतं. डोळे लकाकत होते. असलं सावज तिच्या पाहण्यात नव्हतं. आजवर तिनं कैक पाहिली. पर असलं सावज नाही."[११] न राहवून ती आलीला तो भुजंग दाखवते. आलीखां त्याच्या मागे लागतो. आली पुंगी वाजवील तसा भुजंग डोलू लागतो. खाला आलीला सांगत असते की, "त्याला छेडू नका जाऊ द्या. जनावर भारी आहे" सरदाऱ्या गेला पण हा बहादुऱ्या देवून गेला असे आलीचे म्हणणे असते. आलीखां भुजंगाची मानगुटी पकरणार तोच भुजंग जोराचा फण्याचा मारा करतो. त्याच्या पायाचे बोट कडकडून फोडतो.

अशा अवस्थेतही आली त्याला पकडून टोपलीत घालतो. आलीला खाला पालात घेवून येते. त्याच्या शरीरात विष भिनू लागते व त्यामुळे अंग निळे पडू लागते. खालाच्या अंगावर हात फिरवत तो म्हणू लागतो, "माझं आता संपलं ही दोन लेकरं आहेत. यांचा सांभाळ कर. माझ्या मरणाचं मला काय वाटत नाही. पण तू? ही दोन लेकरं? यांना अर्ध्या वाटेत सोडून जातोय"(पुंगी, पृ १०५) असे म्हणत तो डोळे मिटतो. आलीच्या मृत्यूने त्यांच्या कुटुंबावर आणखी संकट येते.

खालाचे वर्णन करताना चारुता सागर म्हणतात की, ''खालाच्या दुःखाला पारावर उरला नाही. ती वेड्यागत ऊर बडवून घेऊ लागली. पोरं रडू लागली. टोपलीतल्या काळाला खाऊ का गिळू, असं तिला झालं. आलीखाचं गुणगान करून ती हंबरू लागली.''[१२]

ज्या जनावरानं नवऱ्याचा बळी घेतला, त्याला दूध पाजून आपण पोसतोय. आपलाच वैरी आपण पोसतोय. असे वाटून ती त्याला मारावे असा विचार करू लागते. पण लगेच मनात येते की, ''झालं गेलं विसरून जावं. याला खेळ शिकवावा पुष्कळ मिळकत मिळवून देईल.'' (पुंगी, पृ १०५)

एकदिवस ती उठते व हातात काठी घेऊन त्याला मारायला धावते. परंतु पोरं तिला कवळा घालतात व हा किती उपयोगी आहे हे समजावून सांगतात.

चारुता सागरांची 'पुंगी' ही कथा प्राण्यावर माया करणाऱ्या, त्यांना मुलाप्रमाणे सांभाळणाऱ्या समाजातील आली व खाला ह्या कुटुंबावर आधारित आहे. त्याच्या वाट्याला आलेली दुःखे व त्यातून मार्ग काढून पोट भरण्यासाठी त्यांचे प्रयत्न याचे समर्पक उदाहरण म्हणजे 'पुंगी' ही कथा होय. एका उपेक्षित कुटूंबाचे चारुता सागर यांनी केलेले चित्रण अत्यंत समर्पक रितीने प्रकट झालेले आहे.

चारुता सागरांच्या कथेतील उपेक्षितांविषयी अविनाश टिळक म्हणतात की, ''त्यांच्या कथा दलित, शोषित, पीडित माणसांचे एक अनोखे जग वाचकांसमोर उभे करतात. साधू, वैरागी, जोगती, पारधी, डोंबारी, गारूडी आदि सहसा दखल न घेतल्या जाणाऱ्या माणसांची दुःखे ते आपल्या कथांतून साकार करतात.''[१३]

५) देवदासी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा–

चारुता सागर यांच्या कथांतून सामाजिक चालीरितीचे चित्रण आलेले आहे. याचे प्रत्ययकारी उदाहरण म्हणजे 'दर्शन ही कथा. या कथेतून त्यांनी जोगतिणीच्या वाट्याला कशाप्रकारे दुःख येते याचे विदारक चित्रण केलेले आहे.

त्यांच्या 'दर्शन' या कथेविषयी म.द.हातकणंगलेकर म्हणतात, ''या कथेत जोगतिण्यांचे जिण्याचे दशावतार दाखविले असले आणि त्यातील अनेक बारीक तपशील स्त्रियांनाच माहीत असण्याची शक्यता जाणवत असली, तरी स्त्रीमनाची वाटत नव्हती. ती जाणीव एका चिंतनपक्व, समतोल सोशीक पुरुषमनाची होती.''[१४]

'दर्शन' या कथेच्या नायिकेचे नाव 'पुतळा' हे आहे. तिच्या जीवनाच्या अखेरच्या घटकेत तिच्या डोळ्यापुढे संपूर्ण जीवनपट उभा राहतो. 'तुळसाई' ही पुतळाची आई. तुळसाई डोंगराच्या म्हणजेच सौंदतीच्या यल्लमाची जोगतीण असते. तिच्या पोटी पुतळ्याचा जन्म झालेला असतो. पुतळाच्या लहानपणीच तुळसाई मरते. पुतळाला लहानपणीच्या अनेक गोष्टी आठवू लागतात. लहानपणी पुतळा तुळसाईच्या गळ्यातील तांबड्या-पांढऱ्या मण्याची माळ पाहून विचारायची, ''आई, ही माळ ग कशाची? कशाला बांधलीयास गळ्यात? गळ्याला नाही शोभा देत काढून टाक'' (दर्शन, पृ. १२३) त्यावर तुळसाई तिला समजावून सांगते की, ''ही माळ न्हवं. दर्शन आहे. आपल्या देवीचं. आपल्या घरचं. वाडवडील याची पाळणूक करत आलेत. घरातील पहिली मुलगी देवीला सोडायची. तिच्या गळ्यात हे दर्शन बांधायचं. एखाद्या पिढीत मुलगी पैदीच झाली नाही, तर हे दर्शन घरात अधांतरी बांधून ठेवायचं आणि जेव्हा मुलगी पैदा होईल, तेव्हा तिच्या गळ्यात बांधून तिला जोगतीण सोडायची. ही या घरची वहिवाट. वंशजांनी पाळायची.'' (दर्शन, पृ. १२४)

पुतळालाही जोगतीण म्हणून सोडण्याचा कार्यक्रम होणार असतो. त्यासाठी सगळीकडचे जोगजोगते येतात. पुतळाला कळसात पाणी घालून साडीचोळी करून फुलांच्या माळा घातल्या जातात. लिंब नेसवून भंडारा लावला जातो. चवंडकं, तुणतुणं, झांझरीच्या तालावर देवीची गाणी म्हटली जातात. भंडारा उधळत उदं, आई! उदंऽऽ। उदं.....' असा देवीचा जयघोष केला जातो. रात्री जोगत्याचा नाचगाणे झाल्यानंतर तिला देवळातल्या शेज सजविलेल्या खोलीत नेले जाते. देवीच्या वतीने पुजारी तिच्या लग्नाची सांगता करतो. दगडाखाली पाठ सापडावी तशी तिची अवस्था होते. व तिचे बालपण तिथेच संपते.

तिच्याबरोबरच्या गावातील मुली तिला विचारतात की, 'तुला जोगतीण म्हणून सोडलिया व्हयं?' वात्रट मुलेही तिला ''देवीचं जितराब, आलं बधा हिंडून. बिनदाव्याचं जनावर कुठंही चरत जायचं. कुणाच्याही वळचणीला थांबायचं.''(दर्शन, पृ. १२५) राघूच्या ताफ्यात तिचा प्रवेश होतो. तमाशातल्या नाच्यासारखे पायात घुंगरू बांधले जातात. दोन वर्षातच राघू व बायना पुतळाला नाचगाण्यात तरबेज करतात.

राघूच्या ताफ्यात तिच्यासारखी भरणीची जोगतीण गेल्याने त्याची मिळकत वाढते. दोन वर्षाच्या अवधीत शरीरसंबंधाची विविध रूपे तिच्यासमोर येतात. एकेदिवशी शेजारच्या गावात भंडारा असतो. तिथे तिला राघू खूप नाचवतो. रात्री तिला राघू जवळ घेतो व म्हणतो, ''पुतळा, आज तुझ्यावरनं जीव ओवाळून टाकावासा वाटतो बघ''(दर्शन, पृ. १२८) तेव्हापासून राघूचे दररोज घरी येणे असावे असे तिला वाटू लागते. डोंगराच्या जत्रेत त्याच्या ताफ्यात झांझरी वाजवण्यास आण्णू येतो. लहानपणी आण्णू आजारी पडल्याने त्यांच्या आईच्या नवस बोलण्याने त्याला जोगता म्हणून सोडलेले असते.

हळूहळू आण्णू आणि पुतळाचे संबंध वाढू लागतात. ताफ्यातील नागू हा धड पुरुषही नसतो व बाईही नसते. नागूच्या तावडीतून पुतळा आण्णूची सुटका करते व नवीन ताफा उभारते. पुतळाला दिवस जातात. पण आण्णू हे मान्य न करता, 'हे माझं नाही, कुणाचं असंल, तिकडं जा!'(दर्शन, पृ. १३०) असे म्हणून ताफा सोडून निघून जातो. ती निराधार होते. तेव्हा तिला कळते की स्त्रीला पुरुषाचा आधार का हवा असतो. तिलाही कळत नाही की पोटात वाढणारा गर्भ आण्णूचा आहे की राघूचा की बाळाचा!

साळगावच्या पुजारीणकडे जावून ती मोकळी होते. पुन्हा नवीन ताफ्यात प्रवेश करतो व मनाशी ठरविते की येथून पुढे कोणत्याही पुरुषाला स्पर्श करु द्यायचा नाही, असेच दहा बारा वर्षे निघून जातात.

एकेदिवशी पुतळाला तुळसाईचा सांगावा येतो की, 'मी धरणीला टेकलीया. माझ्यानं आता होत नाही. तू असशील, तशी ये.' (दर्शन, पृ. १३२) तुळसाई पुतळाला भक्ताने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कशी द्यायची, भूत-भविष्य कसे सांगायचे, दृष्टांत कसा द्यायचा कसा द्यायचा अशा अनेक गोष्टी शिकविते.

तुळसाईच्या माघारी पुतळा नित्यनेमाने पूजाअर्चा करू लागते. तिच्या विषयी लोकांच्या मनात श्रध्दा वाढू लागते. याविषयी लेखक म्हणतो, ''पुतळाईला भूत-भविष्य कळतं. अंगाऱ्याला गुण येतो, ही बोलवा सगळ्या पंचक्रोशीत पसरली. मंगळवार-शुक्रवार गर्दी वाढू लागली. आवसं-पुनवेला तर बसाय जागा नाही. लोक लांबलांबून येऊ लागले. ''[१५]

संसारात येणाऱ्या अडीअडचणीतून मार्ग काढण्यासाठी अनेकजण पुतळाईकडे येऊ लागतात. संसारी स्त्रियांकडे पाहून तिच्या मनात अनेक विचार येतात. ती म्हणते, ''नदीला किनारा असल्यासारखं किनाऱ्यामुळं नदीला नदीपण मिळतं. प्रवाह झुळझुळत वाहतो. अगदी निर्मळ दवबिंदूसारखा. स्त्रीलाही असंच

संसारामुळं सौभाग्य लाभतं. ती फुलते, फळते. तिच्या स्त्रीदेहाचं सार्थक होतं आणि आपलं आयुष्य.''(दर्शन, पृ. १३२)

हा सर्व भूतकाळ तिच्या डोळ्यापुढून जातो व समोर बारावर्षाची भावाची मुलगी रूकी उभी असते. पुतळाई स्वतःच्या गळ्यातील दर्शन आता रूकीच्या गळ्यात बांधणार असते. त्यासाठी विधीचीही तयारी होते. पुतळाईच्या निष्प्राण होत चाललेल्या देहाकडे पाहून तिचा भाऊ तिला आधार देत असतो.

शेवटी रूकीच्या गळ्यात दर्शन बांधताना तिची ज्योत मालवते व हातातील दर्शन देवीच्या पायावर पडते. चारुता सागर यांच्या या कथेविषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात, ''दर्शन या कथेत जोगतिणीच्या आयुष्याचे घडणारे दर्शन मनाला स्तिमित करणारे आहे. हे घडवून आणताना, आजपर्यंत अज्ञात राहिलेल्या जोगतिणीच्या खाजगी जीवनाचा तपशील सागरांनी फार मोठ्या आस्थेने पण कलात्मक अलिप्तपणाने आपल्या समोर मांडला आहे. त्यामुळे या दर्शनाला दुःखाची व्याकूळ सुरावट लाभते आणि ते पितळेच्या लखलखीत मुखवट्यासारखे गूढ व गहिरे बनत आहे. श्रध्देतून निर्माण झालेले या आयुष्याचे दैन्य योग्य जाणिवेने कदाचित संपलेदेखील, अशी मुक्तीची आसदेखील या दर्शनाला सागरांनी लावून ठेवली आहे. ''[१६]

अशाप्रकारे चारुता सागर यांनी देवीला जोगतीण म्हणून सोडलेल्या स्त्रियांच्या वाट्याला किती अमानुषपणे वागणूक मिळते व त्यांना कशाप्रकारे उपेक्षित जीवन जगावे लागते याचे चित्रण 'दर्शन' या कथेतून अगदी समर्पकपणे मांडलेले आहे.

६) रामोशी समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा–

समाजात काही अशाही व्यक्ती आहेत की ज्यांना दोनवेळचे अन्नही मिळणे कठीण असते. ते मिळविण्यासाठी अनेक मार्ग शोधावे लागतात. अशाचप्रकारे भूकेने व्याकूळ झालेल्या रामोशी समाजातील कुटुंबाची काय अवस्था होते याचे चित्रण चारुता सागर यांनी 'भूक' या कथेत केलेले आहे.

'भूक' या कथेच्या नायकाचे नाव 'बाबाजी' आहे. पावसामुळे बाबाजीने धोतराची खोळ अंगाभोवती मुस्कटून घेतलेली आहे. तिथे जवळच त्याची बायको धनव्वा बसलेली आहे. तिने तान्या पोराच्या तोंडात थान दिलेले आहे. त्यांची गंगी नावाची पोरगी भूक लागल्याने आईला म्हणत असते की, "हुऽ ई आय्योऽऽ, भाकरी दे की गऽऽ मला भूक लागलीया पोटात काय हाय का आमच्या? बघ किती भकाळी गेलंय." (भूक, पृ. १३४)

केच्या नावाचा त्यांचा मुलगाही भूकेने व्याकूळ झालेला असतो. लेखक त्याचे वर्णन करताना म्हणतो, "आपले राड पाय घेऊन आईच्या पाठी चिपकला.....नामाच्या चुलीपुढची भाकरी. नाकात बसलेला भाकरीचा वास. त्या वासानं वखवखलेली भूक.....आईच्या पाठीवरचा उघडा भाग तो जिभेने चाटू लागला. त्याचा खारटपणा चवदार लागला आणि दात त्यावर घट्ट रोवले."[१७] त्यावर त्याची आई त्याला मारत बाजूला सारते. हा सारा प्रकार बाबाजी पहात असतो. धनव्वाच्या मनातही अनेक विचार येतात. ती म्हणते, "चार दिवस झालं. पोराच्या पोटात अन्नाचा कण नाही. आपली ती आतडी तोडाय लागलेत. काय म्हणायचं त्यास्नी?" (भूक, पृ. १३५)

त्यांच्या कुटुंबावर अनेक वेळा अशी उपासमारीची वेळ आलेली असते. हातावरची पोटं असल्याने लोकांच्या शेतमळ्यांत कामाला जावे तेव्हाकुठे त्यांना

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शेरभर दाणं किंवा पावली कमी रुपाया मिळत व त्यावरच कुटुंबाचे पोट चालत असत.

पावसाळ्यात तर त्यांना पोटासाठी प्रत्येकापुढे हात पसरावे लागत. मुलं झाली तरी त्याच्यावरची उपासमारीची वेळ टळली नाही. दोन दिवस मागत फिरूनही त्यांना कुणी मदत करीत नाहीत. अंगावर आगाऊ उचल मागताच प्रत्येकजण तिला म्हणत, ''अगं, एक का म्हणतेस, मस्त पाच दिवसांचा दिलाय. त्योच अगूदर फेड, मग पुन्हा मागाय ये.'' (भूक, पृ. १३६) पुढे न मागता खिन्न मनाने ती घरी परत येते. बाबाजीला कुठेतरी काही मिळते का पाहण्यास सांगते. बायकोच्या समजुतीखातर बाबाजी उठतो. प्रत्येक ठिकाणी जाऊन तो मागून येतो. पण पदरात काही मिळत नाही.

मुलगी आजारी पडल्यावर डॉक्टरांना दाखविल्यानंतर डॉक्टर पाच रुपये मागताच बाबाजी म्हणतो, ''डॉक्टर, माझी पोरगीसुध्दा पाच रुपयाच्या किंमतीची न्हाई. जगली, जगू द्या! जगात का सगळ्यास्नी औषध मिळतंय?'' (भूक, पृ. १३७) मुलीच्या औषधासाठी त्याच्याकडे पुरेसी रक्कम नसते. रात्री पावसात तो वाण्याकडून एक पावलीचा गूळ व चवली भराची पावडर घेवून परत फिरतो. रामोसवाड्यातील वीसभर झोपड्या अंधारात बुडालेल्या असतात. त्याच्या मनात विचार येतात की, ''खून करणं, दरवडे घालणं आपला पिढीजात धंदा. वाडवडील हेच करीत आले'' (भूक, पृ. १३८)

आढ्याच्या पाख्याला वीतभर लांब पात्याची कुऱ्हाड त्याच्या दृष्टीपुढे दिसू लागते. आईच्या सांगण्यावरून त्याने त्या वाटेकडे पाठ फिरवलेली असते. या जुन्या आठवणी आठवत तो मोठ्या कष्टाने कुऱ्हाड घेऊन उठतो व बाहेर पडतो. मोकाशाच्या मळ्यातील मक्याची कणसं आणण्यासाठी तो मळ्याकडे वळतो. मक्याच्या शेतात येऊन तो पाठीवरची खोळ भरू लागतो. त्यातच त्याला उपाशी

असलेल्या पोरांची आठवण येते. या विचाराच्या तंद्रीत मक्यांच्या ताटांचा आवाज होतो. या आवाजाने राखणीला आलेल्या हऱ्याला जाग येते.

बाबाजी खोळ भरून पळू लागतो. पण हऱ्या, धोंडिबा, बाळक्या हे सर्वजण त्याला पकडतात. सर्वजण त्याला चोप देऊ लागतात. बाबाजीच्या मनात अनेक विचार येतात. आपले तोंड लपवण्याचा प्रयत्न करतो. तो म्हणतो, ''अस्सं वाळूत तोंड खूपसून जीव द्यावा. पण हे तोंड दावाया नको. मी बाबाजी नाईक हे कळाय नको.'' (भूक, पृ. १४२) ''कोण आहेस तू? बोल. तोंड तरी बघू दे'' ''मीऽ मी...बाबाजी नाईक जी....'' हे ऐकताच सर्वांचे हात थंडावतात. बाबाजीला घेऊन ते सर्वजण चावडीकडे जातात. साऱ्या रामोशीवाड्यात ही बातमी वाऱ्यासारखी पसरते की ''बाबाजीनं चोरी केली. त्याला धरून ठिवलाय चावडीत.''(भूक, पृ. १४३)

धनव्वाला समजताच ती चावडीकडे पळते. पाटील बाबाजीला सर्वांच्या समोर चार थोबाडीत मारतो व शिवा हासडून म्हणतो, ''बांधा रं ह्याच्या हाताला काडण्या! न्या पोलिसठाण्यावर. हरामखोर चोरी करतोय.'' (भूक, पृ. १४३) बाबाजीला धरून नेताना त्याच्या कुटुंबाची काय अवस्था होते हे सांगताना लेखक म्हणतो, ''त्यानं कुणाकडं साधं बुबूळसुध्दा वळवून पाहिलं नाही. धनव्वाकडंही नाही. ती मात्र असहायपणे त्याच्याकडे पाहात होती. गंगीच्या डोळ्यांत पाणी फुटलं होतं. ती आईचा पदर धरून मुसमुसत होती. केऱ्या अगतिकपणे बघत होता. त्याला वाटलं, बाबाच्या आडवं जावं नि 'कुठं गा चाललास?' म्हणून विचारावं पण बाबाला धरून नेणारे आपल्याला वाणी किड्यासारखे भिरकावतील, याचीच त्याला भीती वाटली.''[१८]

धनव्वाला शेजारच्या बायका येऊन चार धीराच्या गोष्टी सांगू लागतात. तरीही धनव्वा आपल्या दुचीत मुद्रेने बसलेली असते. तिच्या मनात येते. ''एवढ्या

माणसांतनं धरून नेलं, माणसाची अब्रू कितीशी असती''(भूक, पृ. १४३) शेजारची रखमा भाकरी घेवून येते व धनव्वाला म्हणू लागते, ''ऊठ! पोरं बघ किती भुक्याजली. त्यास्नी जेवू घाल आणि तूही घासभर खा. कवा जेवलासा, कुणास ठाउक!''(भूक, पृ. १४३) परंतु धनव्वा व तिची मुले भाकरीकडे ढुंकूनही पाहत नाहीत. शेवटी लेखक म्हणतो, ''त्यांना आता कसलीच भूक नव्हती. चारी दिशांनी पांगलेल्या माशा मात्र अन्नाच्या वासानं धावून आल्या नि त्यावर घोंगावू लागल्या.''[१९]

अशाप्रकारे रामोशी समाजातील बाबाजी आपला पिढीजात धंदा, चोरी दरोडे सोडून प्रामाणिकपणाने जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतो. पण त्याच्यावर, कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. चारुता सागर यांनी या कथेद्वारे समाजातील उपेक्षित जीवन जगणाऱ्याच्या वाट्याला कशाप्रकारे दुःख, वेदना, अवहेलना उभ्या राहतात याचे समर्पक दर्शन घडविलेले आहे.

७) नंदीवाले समाजातील उपेक्षितांचे चित्रण करणारी कथा–

प्रत्येक समाजात जातीरूढीला धरून जी बंधने असतात त्याला सोडून एखादी वेगळी गोष्ट केली तर तो समाज त्या व्यक्तीला शिक्षा करून समाजातून बहिष्कृत करतो. अशाच पध्दतीने नंदीवाल्या समाजातील प्रसंग चारुता सागर यांनी 'निवाडा' या कथेत मांडलेला आहे.

नंदीवाले समाजातील आप्पाना आणि धुरपा जातीची बंधने तोडून शेवटी पळून जातात. परंतु संपूर्ण समजातून त्यांना बहिष्कृत केले जाते. सुभान्याची आप्पांना, धाकट्या व शिवऱ्या ही तीन मुलं असतात. त्यामध्ये आप्पाना हा सर्वात मोठा असतो. आप्पानाचे त्यांच्याच जातीतील धुरपावर प्रेम असते. परंतु

धुरपाचे लग्न होऊन ती पहिल्यांदाच माहेरी आलेली असते. त्यारात्रीपासून आप्पानाच्या डोळ्याच्या पापण्या कधी मिटलेल्या नसतात. तो विचार करू लागतो, ''सोन्याची सकाळ मावळून जाईल, आजची रात्र गेली की, गेली. मग आपल्या जीवनात काय आहे? उद्या सकाळला तर ती जायाची. दीर न्यायला आलाय. आपलं पंख उपटून टाकलेल्या ल्हाव्या पक्ष्यागत भारभूत जीवन.'' (निवाडा, पृ. ९२)

रात्रीच उठून तो अंग चोरून बाहेर पडतो. चोर पाऊलांनी तो धुरपाच्या पाल्याजवळ येतो. चार दिवसापूर्वीच त्यांनी पळून जाण्याचा बेत केलेला असतो. तेव्हा तो धुरपाला म्हणतो, ''धुरपा, कुणी माझ्यापुढं हिऱ्या-माणकाची रास ओतली, तरी मी तुला पसंत करीन. जगातल्या साऱ्या वस्तू नंदीपुढनं काढून टाकलेल्या चगाळासारख्या आहेत.''(निवाडा, पृ. ९२) त्या रात्री आप्पानाच्या इशाऱ्याने ती बाहेर पडते व दोघेही अंधारात चालू लागतात. बऱ्याच वेळानंतर दोघेजण थांबतात. तिच्याकडे पाहून आप्पाना म्हणतो, ''सगळं टाकून एका वस्त्रानीशी पालाबाहेर पडली. फक्त माझ्यासाठी. स्त्रीची जात कधी कशाचा त्याग करील सांगता येत नाही.'' (निवाडा, पृ. ९३) दोघेही विश्रांती करतात पण आपण कुठे आहोत याची माहिती त्यांना नसते.

रोजच्याप्रमाणे सकाळ होताच प्रत्येकजण आपापल्या कामाला लागतात. धुरपाला उठविण्यासाठी तिची आई जाते, तर धुरपा अंथरुणात नसते. धुरपा नाही ही गोष्ट सगळीकडे वाऱ्यासारखी पसरते. आप्पानाच्या गुन्ह्याचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ''सुभान्याच्या पोरानं धुरपीला पळवून नेली. कधी न घडलेली गोष्ट घडली. धर्माने वागणारी जात. कधी कुणाची चोरी नाही. लांडीलबाडी नाही. छळ नाही, कपट नाही. धर्मानं मिळेल ते खायचं.....जमातीतल्या जमातीत एखादी बाई घसरणार नाही. नवरा नको असला, तर सोडून देईल, आणि चक्क दुसरं

लगीन करील. पण ज्यांच्या नावानं कुंकू लेईल, त्याच्या पालात राहील. जितका सोपा, तितका अवघड रिवाज आणि आप्पानानं केलं ते रिवाज मोडून केलं. धर्म सोडून केलं. असलं कधी घडलं नाही.''[२०]

तीन दिवस झाले तरी त्यांचा काही सुगावा लागत नाही. संपूर्ण जमात याचा निवाडा करण्याच विचार करतात. 'कुशाबा' हा त्या सगळ्या नंदीवाल्यांचा म्होरक्या असतो. तोच प्रत्येक निर्णय देत असतो. हा गुन्हा सर्वात मोठा आहे म्हणून तो धर्मगुरूला सांगावा धाडतो. पंधरा दिवसात सगळ्या मुलूखातील नंदीवाले येतात. धर्मगुरूही महानंदीवर बसून येतो. त्या सर्वाची सोय करता करता सुभान्याची त्रेधा उडते. त्यांच्यासाठी त्याला ज्याच्यावर पोट भरते त्या नंदीला व दोन वासरांना विकावी लागतात. कथाकार या समाजातील निवाड्या विषयी म्हणतात की, ''नंदीवाले सरकारी कोर्ट-कचेरीत कधी जात नाहीत. जमातीच्या प्रमुखाकडून आपला न्यायनिवाडा करून घेतात. माणूस न्यायासाठी न्याय-मंदिरात येतो. त्याला न्याय मिळाला पाहिजे. पाण्याचं पाणी, दुधाचं दूध ही धर्मगुरूची ठेवण. त्यामुळे न्याय मिळत आला.''[२१]

धर्मगुरूंच्या आदेशावरून पंचवीसभर तरुण नंदीवाले आप्पाना व धुरपाला शोधण्यास निघतात. खरे तर लहान पणापासूनच, त्यांना कळू लागल्यापासूनच त्यांचा एकमेकांवर जीव बसलेला असतो. धुरपाच्या बापाची कुळी ही सुभान्याच्या कुळापेक्षा हलक्या दर्जाची असल्याने सुभान्याने त्यांच्या लग्नाची गोष्ट धुडकावून लावलेली असते.

धुरपा व आप्पाना यांना शेवटी नंदीवाले एका शेतात फासा टाकून पकडतात. त्यांना धर्मगुरूंच्या पुढे आणले जातात. धर्मगुरू दोघांनाही आपापली मते मांडण्यास सांगतात परंतु दोघेही बोलत नाहीत. शेवटी धर्मगुरू त्यांना शिक्षा सुनावतो की, ''आप्पानाने जी गोष्ट केली, ती जातीरूढीला सोडून केली. पण

सर्वस्वी दोष त्याचा आहे म्हणता येणार नाही. त्याचं धुरपावर प्रेम होतं. हे जाणून घेऊन त्याचं धुरपाशी लग्न लावणं योग्य होतं आणि आजची घटना घडली नसती आणि जातीरुढीला धुडकावून आप्पानानं जे केलं, तो गुन्हा मोठा गंभीर आहे. नंदीवाले जमातीच्या इतिहासात पहिल्यांदाच आहे, हे विसरता येत नाही. म्हणून मी त्यांस पाचशे रूपये दंडाची शिक्षा देतो आणि त्या दोघांना जमातीतून बहिष्कृत करतो.'' (निवाडा, पृ. ९८,९९) अशाप्रकारची शिक्षा त्या दोघांना होते.

अशापध्दतीने रूढी परंपरा मोडल्यामुळे त्यांना जमातीतून बहिष्कृत केले जाते. चारुता सागर यांनी समाजातील प्रत्येक जमातीतील उपेक्षित जीवन जगणाऱ्यांचे चित्रण अगदी सहजतेने केलेले आहे.

समारोप –

चारुता सागर यांनी आपल्या 'नागीण' या कथासंग्रहाच्या लेखनाने मराठी कथेमध्ये मोलाची भर घातली आहे. त्यांनी या कथासंग्रहात समाजातील अनेक जमातीतील व्यक्तींची दुःखे समग्रतेने मांडलेले आहे. यामध्ये 'ढोलगं' या कथेत डोंबाऱ्याचा खेळ करून पोट भरणाऱ्या बाबल्या व त्याच्या कुटुंबावर ओढवलेल्या संकटाचे चित्रण केलेले आहे व त्यांना आधार देणाऱ्या शेवंतीचे चित्रण आलेले आहे.

'निवाडा' या कथेत नंदीवाले समाजातील एकमेकांवर प्रेम करणाऱ्या आप्पाना व धुरपाला शेवटी समाज कोणत्या दृष्टीने पाहतो याचे चित्रण चारुता सागर यांनी केलेले आहे. 'पुंगी' या कथेत गारूड्याचा खेळ करणाऱ्या आली व आलीखाला यांच्या कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळतो. चारुता सागर यांची ही कथा मनाला चटका लावणारी आहे.

'वाट' या कथेत फासेपारधी जमातीतील कावरी, तिच्या आईच्या शेवटच्या घटकेत भेटण्यासाठी तिची असलेली धडपड व शेवटी काही दिवस सतत चालूनही आईची भेट न झाल्याने तिची झालेली अवस्था याचे चित्रण केलेले आहे.

'दर्शन' या कथेत जोगतिण्यांच्या तीन पिढ्यांची कर्मकहाणी आहे. त्यांच्या या कथेविषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात, ''प्रत्येक बऱ्यावाईट अनुभवात केवळ माणूस शोधण्याचीच आस असली की लेखकाचे जीवनदर्शन आपोआप कोणती कलात्मक उंची गाठू शकते याची 'दर्शन' ही कथा म्हणजे एक उत्तम नमुना आहे.''[२२]

चारुता सागर यांच्या 'भूक' या कथेतही रामोशी समाजातील कुटुंबावर आलेल्या उपासमारीचा प्रसंग रेखाटलेला आहे. तर 'वर्दी' या कथेत बेवारशी मढी उचलणाऱ्या सत्याप्पा व बन्या यांच्या जीवनाची कहाणीच चारुता सागर यांनी मांडलेली आहे व शेवटी बन्याचा उपासमारीमुळे झालेला अंत लेखकाने सरलतेने टिपलेले आहे.

अशाप्रकारे चारुता सागर यांनी समाजातील दलितांच्या व भटक्या विमुक्तांच्या जीवनातील कारुण्य, वास्तववादी व आणि तरीही कलात्मक पध्दतीने पकडलेले आहे.

संदर्भ –

१) सागर, चारुता : 'नागीण', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. तिसरी आ.१९९१. पृ.क्र. ४९,५०

२) तत्रैव : पृ.क्र. ५५

३) तत्रैव : पृ.क्र. ६४

४) जोंधळे, महावीर : 'दैनिक लोकमत' संपादकीय १ डिसेंबर, २००१, पृ. क्र. ४

५) सागर, चारुता : 'नागीण', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. तिसरी आ.१९९१. पृ.क्र. ६९

६) तत्रैव : पृ.क्र. ७०

७) तत्रैव : पृ.क्र. ११४

८) तत्रैव : पृ.क्र. ११९

९) तत्रैव : पृ.क्र. १२१

१०) पवार, गो.मा. : 'चारुता सागरांची कथा' बंद दरवाजा, दिवाळी अंक, ऑक्टोबर १९६६, पृ.६

११) सागर, चारुता : 'नागीण', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. तिसरी आ.१९९१. पृ.क्र. १०४

१२) तत्रैव : पृ.क्र. १०५

१३) टिळक, अविनाश : 'चारुता सागर– एक विलक्षण ताकदीचा कथाकार' दै.लोकमत (हॅलो सांगली) पृ.क्र. २

१४) हातकणंगलेकर, म.द. : 'मराठी कथा : रूप आणि परिसर'
सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८६,
पृ.क्र.१०६,१०७

१५) सागर, चारुता : 'नागीण', मॅजेस्टिक प्रकाशन,
मुंबई. तिसरी आ.१९९१. पृ.क्र. १३२

१६) हातकणंगलेकर, म.द. : 'मराठी कथा : रूप आणि परिसर'
पूर्वोक्त, पृ.क्र १०८

१७) सागर, चारुता : 'नागीण', मॅजेस्टिक प्रकाशन,
मुंबई. तिसरी आ.१९९१. पृ.क्र. १३५

१८) तत्रैव : पृ.क्र. १४३

१९) तत्रैव : पृ.क्र. १४३

२०) तत्रैव : पृ.क्र. ९६

२१) तत्रैव : पृ.क्र. ९६

२२) हातकणंगलेकर, म.द. : 'मराठी कथा : रूप आणि परिसर'
पूर्वोक्त, पृ.क्र १०९

* * * * *